सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १५८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. १६ जुलै २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## पहलगाम हल्ल्यानंतर पाकीस्तानी दहशतवाद्यांनी आनंदोत्सव केला साजरा

### घटनास्थळी अनेक राऊंड फायर; दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या दोघांना अटक

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१७श्रीनगर

पहलगाममध्ये २६ जणांना ठार मारल्यानंतर, दहशतवाद्यांनी घटनास्थळीच आनंद साजरा केला. आनंद साजरा करण्यासाठी त्यांनी हवेत अनेक राऊंड फायर केले. राष्ट्रीय तपास संस्थेच्या (एनआयए) तपासात हे उघड झाले आहे.



मीडिया रिपोर्ट्सनुसार, ३ दहशतवाद्यांनी हा हल्ला केला. घटनेनंतर लगेचच एका स्थानिक व्यक्तीने दहशतवाद्यांना हवेत गोळीबार करताना पाहिले. ही व्यक्ती आता एनआयएसाठी एक महत्त्वाचा साक्षीदार बनली आहे.साक्षीदाराने सांगितले की, घटनेनंतर, जेव्हा तो बैसरनहून परतत होता, तेव्हा दहशतवाद्यांनी त्याला थांबवले आणि हवेत सुमारे चार राउंड गोळीबार केला.हल्ल्याच्या वेळी, परवेझ अहमद जोथर आणि बशीर अहमद हे दोन स्थानिक नागरिक बैसरनमध्ये दहशतवाद्यांच्या सामानाचे रक्षण करत होते. गेल्या महिन्यात एनआयएने या दोघांनाही अटक केली होती. चौकशीदरम्यान, हे तिन्ही दहशतवादी पाकिस्तानचे असल्याचे आणि लष्कर-ए-तोयबाशी संबंधित असल्याचे उघड झाले.या हल्ल्याचा मास्टरमाइंड लष्कर कमांडर हाशिम मुसा उर्फ सुलेमान असल्याचे सांगितले जात आहे, जो यापूर्वी काश्मीरमध्ये अनेक मोठ्या हल्ल्यांमध्ये सहभागी होता. सोनमर्गमधील झेड-मोड बोगद्यात ७ मजुरांची हत्या केल्याचाही सुलेमानवर आरोप आहे.

#### हल्ल्यापूर्वी परवेझने दहशतवाद्यांना आश्रय दिला, खायला दिले

परवेझ अहमदने चौकशीदरम्यान सांगितले की, घटनेच्या एक दिवस आधी ते तीन दहशतवादी त्याच्या घरी आले होते. त्यांनी कुटुंबासोबत जेवण केले, बैसरनला जाणाऱ्या मार्गाची माहिती घेतली आणि निघताना काही पैसेही दिले. त्यांना दुसऱ्या दिवशी दुपारी बैसरन खोऱ्यात पोहोचण्यास सांगण्यात आले.

## जनसुरक्षा विधेयकाला कडाडून विरोध का केला नाही, हायकमांडची काँग्रेस पदाधिकाऱ्यांना नोटीस?

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१७मुंबई

अलीकडेच जनसुरक्षा विधेयक महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मंजूर झाले. राज्यपालांनी आता यावर स्वाक्षरी केली की, याचे रुपांतर कायद्यात होईल. या विधेयकावर हजारो हरकती, सूचना आल्या होत्या. त्यामुळे यासंदर्भात एक समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीचा अहवाल आल्यावर जनसुरक्षा विधेयक मांडण्यात आले. परंतु, काँग्रेस नेत्यांनी या विधेयकाला कडाडून विरोध न केल्याबाबत हायकमांड नाराज असून, विजय वडेट्टीवार आणि सतेज पाटील यांना नोटीस बजावल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

विधिमंडळ परिसरात विजय वडेट्टीवार यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळेस विजय वडेट्टीवार यांना पक्षाच्या हायकमांडकडून आलेल्या नोटिसीबाबत प्रश्न विचारण्यात आला. यावर बोलताना विजय वडेट्टीवार म्हणाले की, हायकमांडची कुठलीही नोटीस मला आलेली



नाही. हे विधेयक विधानसभेत मांडले गेले, त्यादिवशी नव्हतो. बँकेची निवडणूक होती. त्यामुळे जनसुरक्षा विधेयक आले, तेव्हा मला हजर राहता आले नाही.

सभागृहात काँग्रेस नेत्यांनी योग्य बाजू मांडली नाही, असा सूर उमटत आहे. परंतु, ते योग्य नाही. काँग्रेस नेत्यांनी योग्य पद्धतीने बाजू मांडली. त्या दिवशीचे प्रोसिडिंग आम्ही हायकमांडकडे पाठवणार आहोत. प्रदेशाध्यक्षांनाही त्याची एक प्रत देणार आहोत. खरे तर विरोधकांनी त्या दिवशी सभात्याग करणे गरजेचे होते. परंतु, दुर्दैवाने तसे झाले नाही. तोंड दाबण्याचे काम सरकार करत आहे.

## 'दिनो मोरियाने तोंड उघडले तर अनेकांचा मोरया होईल'

### एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंना इशारा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१७मुंबई

विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू आहे . हे अधिवेशन वादविवाद आणि आरोप-प्रत्यारोपांसह इतर विविध कारणांमुळे वादळी ठरत आहे. आज मुंबईच्या विकास कामावरुन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सभागृहात माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला. मुंबई महानगर पालिका आणि मराठी मुद्द्यावरूनही शिंदे यांनी ठाकरे गटाला सुनावले. यावेळी मिठी नदीच्या गाळ काढण्याचा मुद्दा काढत ठाकरेंवर निशाणा साधला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मिठी नदीतला गाळ कोण काढतोय, यांना गाळ काढायला मराठी माणूस नाही दिसला, तर दिनो मोरिया दिसला. तिथ यांना मोरे दिसला नाही. पण, दिनो मोरीयाने तोंड उघडलं तर अनेकांचा मोरया होणार, असं सांगत एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंना इशारा दिला.




एकनाथ शिंदे म्हणाले, मुंबईबाहेर फेकलेला मुंबईकर पुन्हा मुंबईत येईल, आपण अनेक योजना आणत आहोत. कोळी वाड्याच्याबाबत देखील आपण निर्णय घेतला आहे, बदल घडवण्याचे काम आपण करत आहे. धारावी हा जगातला सर्वात मोठा प्रकल्प आहे, आपण धारावीच्या विकासासाठी जमीन देतोय. पूर्वीच्या सरकारने निर्णय फक्त पात्र लोकांसाठी घेतला होता. पण आम्ही पात्र आणि अपात्र लोकांसाठी निर्णय घेतला आहे

निवडणूक झाली नसली तरी कोणतीही काम थांबलेली नाहीत. मुंबईत बदल होत आहे, ऋमुंबईकर आमच्यासाठी फर्स्ट आहेत आणि इतरांसाठी कंत्राटदार फर्स्ट आहेत. ऋमी मुख्यमंत्री झाल्यानंतर पहिल्यांदा चहल यांना बोलावले आणि खड्ड्यांच्या संदर्भात सांगितले आणि त्यानंतर दोन फेजमध्ये सर्व रस्ते करण्याचे आदेश दिले. ऋपहिला फेज पूर्ण झाला आहे, आपण ऋकाँक्रीटीकरण करत आहोत, त्यामुळे मुंबई खड्डेमुक्त होईल. मुंबई आणि एमएमआर रिजन १.५ ट्रिलियन डॉलरची क्षमता आहे. आमच्यावर ऋमुंबई तोडण्याचा आरोप होतोय पण आम्ही जोडणारे आहोत, असंही एकनाथ शिंदे म्हणाले.

## शास्त्रज्ञ जयंत नारळीकरांच्या नावे विज्ञान व नाविन्यता उपक्रम केंद्र सुरू करणार : आशिष शेलार

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१७मुंबई

राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगामार्फत २०१५ पासून राज्यात काही जिल्ह्यांमध्ये विज्ञान व नाविन्यता उपक्रम केंद्र स्थापन केले आहेत. आता उर्वरित २३ जिल्ह्यांमध्ये ख्र-उ केंद्रे व २८ नवीन टेक्नॉलॉजी लॅब्स उभारण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. एकूण ५ वर्षाच्या कालावधीत ही केंद्रे निर्माण करण्यात येणार आहेत, अशी घोषणा तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी विधानसभेत केली. त्यासाठी राज्य शासनावर अंदाजे १९२ कोटी रुपयांचा आर्थिक भार अपेक्षित आहे ,अशी माहितीही त्यांनी दिली.

भारतीय राज्यघटनेत नागरिकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवणे हे एक मूलभूत कर्तव्य मानले आहे. त्या पार्श्वभूमीवर, शालेय वयातील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड व कुतूहल वाढवण्यासाठी राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगामार्फत २०१५ पासून महाराष्ट्र राज्यात काही जिल्ह्यांमध्ये विज्ञान व नाविन्यता उपक्रम केंद्र स्थापन



केले आहेत. ही योजना यापुढे आता थोर शास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांच्या नावे चालवण्यात येणार आहे. अशा प्रकारची सर्व केंद्र शालेय शिक्षणाशी संबंधित सक्षम शैक्षणिक संस्था यांच्या भागिदारीतून आणि राष्ट्रीय विज्ञान संग्रहालय परिषदेचे नेहरु सायन्स सेंटर, होमी भाभा सेंटर फॉर सायन्स एज्युकेशन, मुक्तांगण एक्सप्लोरेटरी आणि विज्ञान आश्रम यांच्या सहकार्यातून उभारण्यात आली आहेत. शालेय शिक्षण कार्यक्रमाला हा पूरक कार्यक्रम असून विज्ञान शिक्षणासाठी पोषक वातावरण निर्माण करण्यास मदत करतो. महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात, एक विज्ञान आणि नाविन्यपूर्ण उपक्रम केंद्र उभारणे आवश्यक आहे. हे उद्दिष्ट येत्या पाच वर्षात साध्य करण्याचा शासनाचा मानस आहे, असे मंत्री शेलार यांनी स्पष्ट केले.

## महाराष्ट्रातले मंत्री, अधिकारी हनी ट्रॅपमध्ये नाना पटोलेंनी विधानसभेत पेन ड्राइव्हच दाखवला

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१७मुंबई

महाराष्ट्रातले मंत्री, मोठे अधिकारी हे सगळे हनी ट्रॅपमध्ये अडकले आहेत असं नाना पटोले यांनी बुधवारी विधानसभेत सांगितलं होतं. आता आज नाना पटोले यांनी यासंदर्भातला पेन ड्राइव्हच दाखवला. शिवाय ठाणे, नाशिक, मुंबई ही हनी ट्रॅपची केंद्रं बनली आहेत असाही



आरोप काँग्रेसचे आमदार नाना पटोले यांनी केला. माझ्याकडे पेन ड्राइव्ह आहे आणि सरकारचं मत असेल तर आम्ही तो दाखवू शकतो असंही नाना पटोले विधानसभेत म्हणाले.

हनी ट्रॅपच्या माध्यमातून राज्याची महत्त्वाची कागदपत्रं अँटी सोशल मुव्हमेंटच्या हाती चालली आहेत. मला कुणाचंही चारित्र्यहनन करायचं नाही. मात्र या सगळ्याबाबत सरकार गंभीर नाही. साधं निवेदनही द्यायला तयार नाही. त्यामुळे अध्यक्षांनी याबाबत निर्देश द्यावेत अशी विनंती नाना पटोलेंनी केली.

राज्यातील ७२ हून अधिक अधिकारी, काही मंत्री हनीट्रॅपच्या जाळ्यात अडकले आहेत. हनीट्रॅप करणाऱ्यांकडून गोपनीय माहिती गोळा केली जात आहे. तसेच काही अधिकाऱ्यांना ब्लॅकमेल करण्यात आले असून त्यांनी आत्महत्येसारखा टोकाचा विचार केला. सरकार यावर काही बोलायला तयार नाही. त्यामुळे आज मी हा विषय विधानसभेत मांडला, अशी प्रतिक्रिया काँग्रेस नेते नाना पटोले यांनी दिली.

## आरसीबीचा विराट कोहली जबाबदार! बेंगळुरू चेंगराचेंगरी प्रकरणात कर्नाटक सरकारचा अहवाल सादर

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१७बेंगळुरू

बेंगळुरूमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या विजयाच्या जल्लोषादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीबाबत कर्नाटक सरकारने उच्च न्यायालयात आपला अहवाल सादर केला आहे. ३ जून रोजी खझङ २०२५ चॅम्पियन झाल्यानंतर, ठउइने ४ जूनला अतिशय घाईघाईने आणि कसलेही नियोजन न करता विजयी परेड आयोजित केली. या अपघातात ११ जणांचा मृत्यू




झाला, तर ४७ जण जखमी झाले. सरकारने उच्च न्यायालयात सादर केलेल्या या अहवालात अनेक प्रकारच्या गंभीर चुकांचा उल्लेख आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, या संपूर्ण घटनेत विराट कोहलीचे नावही समोर आले आहे.ह्या अहवालात विराट कोहलीचे नाव देण्यामागे एक विशेष कारण देखील समोर येत आहे. ४ जून रोजी बेंगळुरूमधील चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर झालेल्या चेंगराचेंगरीसाठी केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाने (CAT) RCBला जबाबदार धरले. ठउइ ने अचानक सोशल मीडियावर पोलिसांच्या परवानगीशिवाय विजय परेडची घोषणा केली, ज्यामुळे लाखो लोकांची गर्दी झाली. चेंगराचेंगरीत ११ लोकांचा मृत्यू झाला. याच अहवालात म्हटले आहे की, विराट कोहलीने एका व्हिडिओमध्ये चाहत्यांना विजय परेडमध्ये मोफत येण्याचे आवाहन केले. विराटचा चाहता वर्ग मोठा असल्याची त्यालाही कल्पना आहे. त्यामुळे त्याने याचे भान राखणे अपेक्षित होते.

## काल ऑफर आणि आज भेट!

### देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसाठी उद्धव ठाकरे यांनी गाठले विधान परिषद सभापतींचे कार्यालय

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१७मुंबई

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना मिश्कीलपणे सत्ताधारी पक्षात येण्याचे आमंत्रण दिले होते. त्यानंतर आज उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. ही भेट विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या कार्यालयात झाली. त्यांची ही भेट सुमारे २० मिनिटे चालली.यावेळी माजी मुख्यमंत्री



उद्धव ठाकरे आणि आमदार आदित्य ठाकरे यांनी इतर काही आमदारांसह देवेंद्र फडणवीस यांना हिंदी सक्ती हवी कशाला? हे राज्यभरातील विविध संपादकांनी लिहिलेल्या लेखांचे संकलित पुस्तक दिले.यावेळी आमदार भास्कर जाधव, आमदार वरुण सरदेसाई, आमदार सचिन आहिर, आमदार सुनील राऊत आणि मान्यवर उपस्थित होते.

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. १७ जुलै २०२५

शहर/ग्रामिण


## केवळ राजकीय दबावातून...
## शेतकरी हिताचे कामे करणाऱ्या संचालकांवर बरखास्तीची कार्यवाही

### सभापती हरिश मोरे यांनी केले आरोपाचे खंडन



**विदर्भ प्रजासत्ताकदि.१७ अमरावती** – अमरावती च्या कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती पदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर दोन वर्षांत १७कोटींवरुन २१ कोटींवर उत्पन्न पोहोचले आहे. ५ कोटींची विकास कामे तर ७कोटींचे मुदतठेवी जमा झाल्या आहेत. असे असताना बाजार समितीमध्ये अनियमितता कशी असा प्रश्न सभापती हरीश मोरे यांनी पत्रकार परिषदेतून उपस्थित केला. सहकार विभागाच्या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल असताना यावर विधीमंडळात चर्चा करणे योग्य नव्हे.

केवळ राजकीय दबावातून शेतकरी हिताचे कामे करणाऱ्या संचालकांवर बरखास्तीची कार्यवाही निवडणूक निकालानंतर सुरु करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला.आ. संजय खोडके यांनी विधीमंडळात बाजार समितीमध्ये भ्रष्टाचार असल्याचा आरोप करीत बाजार समिती बरखास्तीची मागणी केली. परंतू बाजार समितीचे सभापती हरीश मोरे यांनी सर्व आरोप फेटाळत बाजार समितीमध्ये कुठलाही भ्रष्टाचार झाला नसल्याचा दावा पत्रकार परिषदेतूनकेला आहे. तथाकथीत शेतकऱ्यांनी काहीही कारण नसताना केवळ बाजार समितीला बदनाम करण्याकरिता तक्रारींचा सपाटा लावला आहे. यावर सत्ताधारी पक्षाने राजकारण करीत शासकीय अधिकाऱ्यांवर दबाव आणत बाजार समितीविरोधात अहवाल दिला आहे. आजवर पणन विभागाकडे देखील आम्ही अनेकचा आमचे मत मांडले, परंतु त्यांनी ऐकले नाही. यामूळे – आम्हाला न्यायालयाचा दरवाजा ठोठावा लागला. न्यायालयात सहकार विभागाने दिलेल्या अहवालविरोधात याचिका दाखल असून यावर सुनावणी सुरू असतानाच आ. संजय खोडके यांनी विधीमंडळात सदरचा मुद्दा उपस्थित केला. त्यांनी भ्रष्टाचाराचे आरोप लावले आहे. परंतु बाजार समितीमध्ये कुठलाही भ्रष्टाचार झाला नसून चौकशी अहवालात देखील कागदोपत्री अनियमिता दाखविली आहे. तेही आम्हाला मान्य नसल्याने प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. शिवाय निविदामध्ये स्पर्धा करून आम्ही बाजार समितीचा फायदाच केल्याचे सभापती हरीश मोरे यांनी सांगितले.

## वलगांवमध्ये दारूच्या नशेतधुंद इसमाचा थरारक अपघात!

### पुलावरून ७० फुट खाली कोसळला






**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७ वलगाव –** अमरावती लागत च्या वलगांव येथे नव्याने पुलाचे बांधकाम करण्यात आले या पुलाला सौरक्षक कठडे नसल्याने काल रात्री एका दारूच्या नशेत धुंद व्यक्ती ७०फूट खाली पडला मात्र नन्तर सर्वांना चकित करणारा थरारक प्रकार घडवला. पुलावरून तब्बल ७० फुट खाली हा इसम कोसळला. तरीही, उपस्थित नागरिकांनी धैर्य दाखवत त्याला खांद्यावर उचलून रस्त्यावर आणले. पण यानंतर घडलेल्या प्रकाराने सर्वांचे डोळे विस्फारले!रस्त्यावर आणल्यानंतर हा इसम नशेत नागमोडी चालत स्वत:च्या पायाने गाडीकडे निघाला,मानो त्याला काहीच झालं नाही!उपस्थित लोकांनी या बेपर्वा वृत्तीवर संताप व्यक्त केला,पण तो काही पावलं चालताच पुन्हा जमिनीवर कोसळला.यावेळी वलगांव पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि या व्यक्तीला प्राथमिक उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. हा प्रकार परिसरात चर्चेचा विषय बनला आहे.सदर ईसम हा दुचाकीने अमरावतीहून परतवाडाकडे जात होता,नव्याने बांधलेल्या वलगांव येथील पुलाचा सुरूवातीला आणि शेवटी संरक्षक कठडे नसल्याने तोल जाऊन हा अपघात घडला.–

## मेळघाटातील सिपना नदीला मोठा पूर

### नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा



**विदर्भ प्रजासत्ताकदि.१६ मेळघाट :** ६अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिसरात जोरदार पावसाची नोंद होत असून यावर्षीच्या पावसाळ्यात पहिल्यांदाच सिपना नदीला मोठा पूर आला आहे. गेल्या काही तासांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे सिपना नदीसह अनेक लहान–मोठ्या नद्यांचे पाणीपातळी झपाट्याने वाढली आहे.

नद्या तुडुंब भरून वाहू लागल्यामुळे नदीकाठच्या गावांमध्ये प्रशासनाकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. गावकऱ्यांना सुरक्षित स्थळी हलविण्याची तयारीही प्रशासनाने सुरू केली आहे. आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या असून परिस्थितीवर प्रशासन सतत लक्ष ठेवून आहे.स्थानिक नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## बँकेला दंड वसुली प्रकरण.. जिल्हा बँकेच्या नोटिसचा निर्णय टळला

### २३ जुलै रोजी पुढील सुनावणी होणार



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७ अमरावती –** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने विभागीय सहनिबंधकांना चौकशीकरिता लागणारे कागदपत्रे न पुरविण्याने या विभागाकडून बँकेला दंड वसूल करण्याबाबतची नोटीस बजाविली होती. मात्र, या विरोधात बँकेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली. यावर मंगळवार, १५ जुलै रोजी सुनावणी पार पडली. मात्र कुठलाही निर्णय न देता २३ जुलै रोजी पुढील तारीख देण्यात आली आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेविरोधात बबलू देशमुख गटाच्या संचालकांकडून सत्ताधाऱ्यांविरोधात अनेक तक्रारी केल्या आहेत. या तक्रारीच्या आधारे जिल्हा उपनिबंधकांमार्फत चौकशी सुरू करण्यात आली. त्यानुषंगाने जिल्हा उपनिबंधकां नी जिल्हा बँकेला वेळोवेळी पत्र व्यवहार करून चौकशीकामी बँकेचे दप्तर उपलब्ध करून देण्याबाबत कळविले आहे. तसेच बँकेने बऱ्याचदा चौकशी अधिकारी यांच्यासमोर उपस्थित होऊन दप्तर सादर करण्याकरिता वेळ मिळण्याची विनंती केलेली आहे; परंतु चौकशीकरिता आवश्यक असलेले बँकेचे दप्तर उपलब्ध करून दिलेले नाही, त्यामुळे चौकशीचे काम पूर्ण होऊ शकलेले नाही. परिणामतः आदेशाचे व चौकशी अधिकारी यांच्या आदेशाचे सतत उल्लंघन झाले आहे. त्यामुळे विभागीय सहनिबंधक यांनी २२ मे रोजी बँकेला प्रतिदिवस शंभर रुपये दंड आकारण्यात येईल, अशी नोटीस बजावित याकरिता त्यांना ६ जूनची मुदत दिली होती. दरम्यान, बँकेच्या अध्यक्षांनी उच्च न्यायालयात या नोटीस विरोधात याचिका दाखल केली. यावर १५ जुलैला रोजी सुनावणी पार पडली. परंतु न्यायालयाने त्यांना २३ जुलैची पुढील तारीख दिली आहे.

## मैदान, रस्त्याच्या कडेला व अंधारात दारू पिणाऱ्यांची खैर नाही

### हॉटेल, ढाब्यांवर अवैध दारू विक्रेत्यावर कठोर कारवाई करा– सीपी चावरियांचे अधिकाऱ्यांना कडक निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७ अमरावती –** शहरातील हॉटेल, ढाब्यांवर परवानगीशिवाय दारू विक्री होत असल्याच्या तक्रारींवरून पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी थेट कारवाईचे आदेश दिले आहेत.

शहरातील सर्व ठाण्यांना स्पष्ट सूचना देत त्यांनी म्हटले की, खुले मैदान, निर्जन स्थळे, रात्रीच्या अंधारात संकुलामध्ये किंवा रस्त्याच्या कडेला बसून दारू पिणाऱ्यांवर तात्काळ व कठोर कारवाई करण्यात यावी. १६ जुलै रोजी पोलीस आयुक्त कार्यालयात घेण्यात आलेल्या क्राईम मिटिंगमध्ये त्यांनी हे निर्देश दिले.या बैठकीस पोलिस उपायुक्त गणेश शिंदे,


### पोलिस आयुक्तालयात झाली बैठक



श्याम घुगे, रमेश धुमाळ, सहायक आयुक्त शिवाजीराव बचाटे, कैलास पुंडकर, अरुण पाटील, दत्तात्रय भानवर, गुन्हे शाखेचे निरीक्षक गोरखनाथ जाधव, संदीप चव्हाण, वाहतूक शाखेचे निरीक्षक तसेच शहरातील सर्व १० पोलिस ठाण्यांचे ठाणेदार उपस्थित होते.

बैठकीमध्ये सीपी चावरीयांनी स्पष्टपणे सांगितले की, प्रत्येक पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही कारवाई दररोज केली जावी. अवैध दारू विक्री करणाऱ्यां हॉटेल्स, ढाब्यांवर तात्काळ छापे टाकून संबंधितांविरुद्ध गुन्हे दाखल करा. तसेच सार्वजनिक ठिकाणी, अंधारात कोपऱ्यांमध्ये किंवा रस्त्याच्या कडेला बसून दारू पिणाऱ्यांना वचक बसवण्यासाठी कठोर पावले उचला, असे निर्देश सीपींनी दिले. यासह चाकूने मारहाण करणारे, पोलीस रेकॉर्डवर असलेले सराईत गुन्हेगार, गल्लीत भाईगिरी करणारे अशा सर्वांवर देखील प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात यावी, असे आदेश पोलीस आयुक्तांनी दिले. त्यांनी स्पष्ट सांगितले की, नवीन चेहऱ्यांनी जर गुन्हेगारीचा प्रयत्न केला तर पोलिसांनी अशा प्रकारांवर धडक देऊन त्यांना सबक शिकवावा. आगामी गणेशोत्सव, नवरात्रोत्सव आणि इतर सणांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावीव सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना वेळेत करा, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. शहरातील कायदा–सुव्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी पोलिसांनी आता कारवाईचा दंड थोपटला असून, दारूबाज, सराईत गुन्हेगार व अतिक्रमण करणाऱ्यांसाठी हे आदेश धोक्याची घंटा ठरणार आहेत.

## नागपूर मध्यवर्ती कारागृहात अंडरविअरच्या इलॅस्टिकने कैद्याने घेतली फाशी



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१७नागपूर** – हत्या प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या एका कैद्याने नागपूर मध्यवर्ती कारागृहात गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेमुळे तुरुंग प्रशासनात खळबळ उडाली आहे.तुळशीराम लाकडू शेंडे (५४, मोरगाव अजुर्नी, गोंदिया) असे मृत कैद्याचे नाव आहे. शेंडेने २०१२ मध्ये साकोली येथे हत्या केली होती. त्या प्रकरणात त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. तो छोटी गोलच्या बॅरेक क्रमांक ४ मध्ये होता. बॅरेकजवळ शौचालय आणि रंगकाम विभागाचे गोदाम आहे. मंगळवारी सकाळी ८ वाजता शेंडेने त्याच्या अंतर्वस्त्राच्या इलॅस्टिकचा वापर करत गोदामाच्या खिडकीच्या पट्टीला गळफास घेऊन आत्महत्या केली. गोदाम मागील भागात असल्याने इतरांचे त्याच्याकडे लक्ष गेले नाही. काही वेळाने शेंडेने आत्महत्या केल्याचे कळताच तुरुंगात गोंधळ उडाला. धंतोली पोलिसांना घटनेची माहिती देण्यात आली. पोलिसांनी मृतदेह वैद्यकीय उपचारासाठी पाठवला.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शेंडे काही काळापूर्वी पॅरोलवर बाहेर आला होता. निर्धारित वेळ घालवल्यानंतर तो तुरुंगात परतला. शेंडेच्या आत्महत्येबाबत तुरुंगात विविध चर्चांना उधाण आले आहे. इतक्या कैदी आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांमध्ये शेंडेने आत्महत्या कशी केली व कुणालाही तो तसे करताना दिसला कसा नाही असा सवाल करण्यात येत आहे. धंतोली पोलिसांकडून तपास सुरू आहे.

## चिखलदरा येथील वाहतूक नियंत्रण शुक्रवार ते सोमवार वन वे

### पर्यटकांच्या सुविधांसाठी जिल्हा प्रशासन सज्ज,

### एमआरपी पेक्षा अधिक दराने विक्री केल्यास होणार कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१७ अमरावती–**चिखलदरा येथील विविध पर्यटनस्थळांना भेट देण्यासाठी शनिवारी आणि रविवारी पर्यटक मोठ्या प्रमाणावर येत आहेत. यात वाहतुकीची कोंडी होत असल्याने चिखलदराकडे जाणारा आणि चिखलदरावरून परतवाड्याकडे येताना वनवे वाहतूक नियमन आता शुक्रवारी दुपारी दोन वाजल्यापासून ते सोमवारी दुपारी दोन वाजेपर्यंत राहणार आहे, असे आदेश जिल्हाधिकारी अशिष येरेकर यांनी दिले आहे.

चिखलदरा येथे पर्यटकांच्या सोयीसुविधांकरिता जिल्हाधिकारी कार्यालयात आज बैठक पार पडली. बैठकीला जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्यासह चिखलदरा आणि धारणीचे तहसीलदार, उपवनसंरक्षक आणि नगरपालिकेचे अधिकारी उपस्थित होते.बैठकीमध्ये प्रामुख्याने पर्यटकांना येणाऱ्या अडचणींबाबत चर्चा करण्यात आली. पर्यटकांच्या अडचणी सोडविण्यासाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यात यापूर्वी शनिवार व रविवार या दोन दिवसांत चिखलदराला जाणारी वाहतूक आणि चिखलदऱ्यावरून परतवाड्याकडे येणारी वाहतूक ही वनवे करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. यात आत बदल करून ही वनवे वाहतूक आदल्या दिवशीपासूनच म्हणजे शुक्रवारी दुपारी दोन वाजल्यापासून ते पुढील दिवस म्हणजे सोमवारी दुपारी दोन वाजेपर्यंत ही लागू राहील. यामुळे वाहतूक नियंत्रणास अधिक प्रभावीपणे पार पाडता येईल. वाहतुकीसाठी बनलेले सहा चोक पॉईंट्स शोधण्यात आले असून यामध्ये ५० पोलिसांचा अतिरिक्त बंदोबस्त पुढील काळात चिखलदरा व परिसरामध्ये राहणार आहे. त्यांच्यामार्फत वाहतूक नियंत्रण करण्यात येईल. सोबतच वनविभागाच्या नाक्यावर अतिरिक्त कर्मचारी नियुक्त करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ज्यामुळे वनविभागाच्या नाक्यावरील वाहनांच्या लागणाऱ्या रांगा कमी होण्यास मदत होईल. सोबतच नगर परिषदेच्या नाक्यावर कर्मचारी वाढवण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. यामुळे नाक्यावरील गर्दी कमी होण्यास मदत होईल.




पर्यटकांच्या सुविधांसाठी पोलीस अधिकारी व तहसीलदार यांना पार्किंगसाठी अतिरिक्त जागा शोधण्याच्या सूचना यावेळी करण्यात आल्या. आवश्यकता भासल्यास खाजगी जागा अधिग्रहित करून या ठिकाणी पार्किंगच्या सुविधा जिल्हा प्रशासन उपलब्ध करून देणार आहे. यासोबतच पर्यटकांना गरजेचे असलेल्या पाण्याची बॉटल व इतर खाद्यपदार्थ नियत दरापेक्षा जास्त दराने विक्री केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. याबाबत सर्व आस्थापनांना सूचना देण्यात आल्या. नियत दरापेक्षा जास्त विक्री करीत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यास ग्राहक संरक्षण कायद्याच्या अंतर्गत कारवाई करण्यात येणार आहे.सर्व विभागांशी समन्वय साधून चिखलदरा येथे येणाऱ्या उत्साही पर्यटकांसाठी सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने तयारी पूर्ण केली आहे. पर्यटकांनी चिखलदऱ्याला भेट द्यावी व निसर्गाचा आनंद घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# रजिस्टरवर खोलीची नोंद नव्हती, आरोपींकडून ओळखपत्रही घेतले नाही

## एस.ए.इंपेरियल बार च्या मालक व व्यवस्थापकावर गुन्हा दाखल, पोलिस तपासात उघड झाला प्रकार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७ नांदगावपेठ–** नांदगाव पेठ पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या रहाटगाव येथील एस.ए. इम्पेरियल बारमधील लॉजिंगमध्ये मद्य पार्टीनंतर झालेल्या राजकुमार सुंदरानी यांच्या खून प्रकरणात आता बारमालक व व्यवस्थापक अडचणीत आले आहेत. आरोपींचे ओळखपत्र न तपासताच खोली दिली गेल्याचे तपासात निष्पन्न झाले तसेच रजिस्टरवर खोली दिल्याची नोंद न घेतल्याने तसेच मध्यरात्री खोली मधील ग्राहकांना हॉटेल व्यवस्थापनाने मद्य पोहचविल्यामुळे नांदगावपेठ पोलिसांनी बारमालक व व्यवस्थापकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. १२ जुलै रोजी रात्री, आरोपी बंटी पवार (३०, रा. लोहार लाईन, विलासनगर) व शिवा फुलवाणी (४२, रा. रामपुरी कॅम्प) यांनी राजकुमार तहलराम सुंदरानी (५४, रा. साई मंदिराजवळ, रामपुरी कॅम्प) यांच्यासोबत एस.ए. इम्पेरियल बारच्या खोली क्रमांक १०२ मध्ये मद्यपान केले.यावेळी अन्य दोन मित्र रवी तेजानी व अजय मेटानी हे सुद्धा खोलीत होते.मध्यरात्री ३ वाजता बारबाहेर आल्यानंतर किरकोळ कारणावरून आरोपी बंटी पवार, शिवा फुलवानी व राजकुमार सुंदरानी या तिघांमध्ये वाद उफाळून आला. या वादाचे पर्यवसान चाकूहल्ल्यात झाले आणि आरोपी बंटी पवार व शिवा फुलवानी यांनी बारसमोरच राजकुमार सुंदरानी यांची हत्या केली. हत्या झाल्यानंतर दोन्ही आरोपी घटनास्थळावरून फरार झाले होते.



राजकुमार सुंदरानी हत्या प्रकरण

ही घटना घडल्यानंतर पोलिस तपास सुरू झाला असता, बारमधील लॉजिंग रजिस्टरमध्ये आरोपींच्या नावाची तसेच खोली दिल्याची नोंद नव्हती, तसेच त्यांच्याकडून कोणतेही ओळखपत्र हॉटेल च्या वतीने घेण्यात आले नव्हते,ज्या १०८ क्रमांकाच्या खोलीत राजकुमार सुंदरानी तसेच आरोपी बसले होते त्या खोलीत रात्री ३ वाजता वेटरने मद्य पोहचविल्याचे सीसीटीव्ही फुटेज मध्ये आढळले.बार व्यवस्थापनाने अनधिकृतपणे लॉजमध्ये राहण्याची व परवान्याचे उल्लंघन करुन ग्राहकांना विहीत वेळेपेक्षा जास्त कालावधीत मद्य पुरविल्याचे दिसुन आले. सदर बार व्यवस्थापक याने महाराष्ट्र शासनाचे अधिसुचना व आदेशाचे तसेच पोलीसांनी दिलेल्या मौखिक आदेशाचे ठरवुन दिलेल्या निर्धारित वेळेपेक्षा अधिक वेळ हॉटेल सुर ठेवुन शासनाच्या आदेशाचे अनुज्ञप्ती परवान्याचे उल्लंघन केल्याचे निर्दशनास आले . करिता नांदगावपेठ पोलीस ठाण्याचे हेड कॉन्स्टेबल संजय धनराज देऊळकर यांच्या तक्रारीवरून बारमालक मुद्दतसर अली व व्यवस्थापक विजय पुरणलाल खत्री (दोघेही रा. अमरावती) यांच्याविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३ सहकलम मदाका ८२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान फरार आरोपी बंटी पवार व शिवा फुलवाणी यांना राजस्थानमधील कोटा शहरातून सोमवारी अटक करण्यात आली.दोन्ही आरोपींना १८ जुलै पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली असून नांदगाव पेठ पोलीस आरोपींची कसून चौकशी करत आहे.–

# भातकुली शहरातील वाल्मिकी भवन चे काम केव्हा पूर्ण होणार

## कोळी समाजातील नागरिकांनी केला प्रश्न उपस्थित




**विदर्भ प्राजस्टक दि.१७ भातकुली–** येथील हे शहर तालुक्याचे ठिकाण आहे या शहरांमध्ये सर्वात जास्त महादेव कोळी हा समाज राहत असून परंतु भातकुली नगरपंचायत च्या निधीतून अंदाजे ५० लक्ष वाल्मिकी भवन करिता दिली आहेपरंतु लोकसभा विधानसभा निवडणूक वेळी वाल्मिकी भवनाचे काम सुरू झाले होते निवडणूक संपून जवळजवळ एक वर्षाचा कालावधी उलटून गेला असून वाल्मिकी भावनाचे काम पूर्ण झाले नाही त्यामुळे कोळी समाजातील बांधवांनी प्रश्न उपस्थित केला आहे की या वाल्मिकी भवनाचे काम केव्हा होणार?वाल्मिकी भावनाचे काम झाले असते तर गोरगरिबाचे मुला मुलीचे लग्न करायच्या उपयोगी पडले असते.बडनेरा मतदारसंघाचे आमदार रवी राणा लक्ष देतील का असा प्रश्न नागरिकांना पडला आहे वाल्मिकी भवन केव्हा तयार होणार गोरगरिबांच्या लग्नासाठी केव्हा कामे येणार असा प्रश्न नागरिकांना पडला आहे भातकुली नगरपंचायत श्री वाल्मिकी भवन नगरपंचायत बांधकाम सभापती लक्ष देतील का तसेच मुख्याधिकारी नगराध्यक्ष नगर उपाध्यक्ष लक्ष देतील का असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे.

# ८ ते १२ ऑगस्टपर्यंत तयार करावी लागणार नगररचना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**


मनपामहानगर पालिका निवडणुकीसाठी सध्या अमरावती मनपाची ४ सदस्यांनुसार प्रभागरचना कशी असणार, याबाबत उत्सुकता लागून राहिली असून मनपाला २५ जुलै ते ७ ऑगस्ट या कालावधीत प्रारूप प्रभाग रचनेचा मसुदा तयार करूनतो ८ ते १२ ऑगस्ट या कालावधीत नगररचना विभागाकडे पाठवायचा आहे. या दृष्टीने महानगरपालिका निवडणूक विभागाने तयारी सुरू केल्याची माहिती मनपा निवडणूक अधिकार्यांनी दिली. नगरविकास विभाग प्रारूप नगररचनेचा प्रस्ताव १३ ते २५ ऑगस्ट या कालावधीत राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवणार आहे.

निवडणूक आयोगाने प्रारूप प्रभाग रचनेला मान्यता दिल्यानंतर महानगरपालिका आयुक्तांना तो ३ ते ८ सप्टेंबर या कालावधीत प्रसिध्द करून त्यार हरकती व सूचना मागवायच्या आहेत. ९ ते १८ सप्टेंबर या ९ दिवसांच्या कालावधीत जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकार्यांना प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी घ्यायची आहे. सुनावणीनंतर हरकती व सूचनांवरील शिफारशी विचारात घेऊन प्राधिकृत अधिकार्यांनी अंतिम केलेली प्रभाग रचना १९ ते २२ सप्टेंबर या कालावधीत नगर विकास विभागाला सादर करावी लागणार आहे.नगर विकास विभाग २३ ते २९ सप्टेंबर या कालावधीत अंतिम प्रभाग रचना निवडणूक आयोगाकडे सादर करतील. राज्य निवडणूक आयोगाने अंतिम केलेली प्रभाग रचना ९ ते १३ ऑक्टोबर या कालावधीत अधिसूचनेव्दारे मनपा आयुक्त प्रसिध्द करतील. त्यानंतर मतदान यादी तयार करण्याचे काम हाती घेतले जाणार आहे.



# जिल्हा रुग्णालयात गर्दी वाढल्याने खाली गाद्या टाकून रुग्णांवर उपचार

## खासगी क्लिनिक, हॉस्पिटल्समध्येही रुग्णांची गर्दी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती –** सतत बदलत असलेल्या काहीशा विचित्र वातावरणामुळे व्हायरल इन्फेक्शनने सध्या जिल्ह्यात कहर केला असून, डास, किटकांपासून तसेच पाण्यापासून होणाऱ्या साथरोगांनी चांगलेच हातपाय पसरले आहेत. खासगी क्लिनिक, हॉस्पीटल्समध्ये विविध आजारांच्या रुग्णांची संख्या वाढली असून, जिल्हा सामान्य रुग्णालयातील बाह्य रुग्ण विभागात रुग्णांसह नातेवाइकांच्या रांगा लागल्या आहेत.

जिल्हा सामान्य रुग्णालयात एका खाटेवर दोन रुग्ण ठेवण्याची वेळ आली होती. परंतु, रुग्णालय प्रशासनाने काहींना खाली गादी टाकून तर काहींची अस्थिरोगासारख्या वॉर्डात जेथे रुग्णांची संख्या कमी आहे, तेथे सोय केल्यामुळे रुग्णांची तात्पुरती सोय झाली आहे.

मागील पंधरा दिवसापासून जिल्हा सामान्य रुग्णालय येथे रुग्णसंकेत वाढ झाली आहे. ओपीडी मध्ये दर दिवशी ६० ते ७० रुग्ण सर्दी, खोकला, तापाचे येत आहेत. तसेच जिल्ह्यातील उप जिल्हा रुग्णालयात दिवसाला १२० ते १५० रुग्ण रोज उपचार घेत आहेत. तर प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये ग्रामीण भागातील दिवसाला ४० रुग्ण उपचार घेत आहेत. तसेच शहर व गावागावतील खासगी दवाखान्यात ही मोठ्या प्रमाणात रूग्ण उपचार घेत असल्याचे सध्या चित्र पाहायला मिळत उर्वरित. पान ४ पावसाळ्यात जलजन्य, किटकजन्य आजारांचे प्रमाण वाढते. बाह्य रुग्ण विभागात (ओपीडी) या रुग्णांची संख्या वाढली. पूर्वी १० ते १५ रुग्ण व्हायरल फिव्हरचे असायचे, आता दरदिवशी ६० ते ७० रुग्ण येत आहेत. यातील काही रुग्णांना पुढील उपचारासाठी दाखल करावे लागते. सद्या रुग्णालयात खाटा उपलब्ध आहे. डॉ दिलीप सौंदळे, जिल्हा शल्य चिकित्सक.

जिल्ह्यात सहा महिन्यात डेंग्यू आजाराचे ५२ रुग्ण जानेवारी ते जून या सहा महिन्यांत जिल्ह्यात डेंग्यू संशयितांचे ६६१ नमुने घेण्यात आले. त्यापैकी तपासणीअंती ५२ रुग्ण पॉझिटीव्ह आढळले. यात ग्रामीण क्षेत्रात ४७९ नमुने घेतले. . त्यात ३५ डेंग्यू रुग्ण आढळून आले. मनपा क्षेत्रात १९२ नमुन्यांमध्ये १७ डेंग्यूचे रुग्ण आहेत. ग्रामीण भागात ३३ तर शहरात १० चिकनगुनिया चे रुग्ण आढळले. शहरात जुलैच्या सुरुवातीला संशयित ९ नागरिकांचे नमूने घेण्यात आले. त्यामध्ये ८ रुग्ण पॉझिटिव्ह आढळले आहे. ज्यात डेंग्यूच्या ४ तर ४ चिकनगुनियाच्या रुग्णांचा समावेश आहे.

# मोर्शीत ४ ऑगस्ट रोजी कावडयात्रेचे आयोजन

## तयारी पोहचली अंतिम टप्प्यात !



**विदर्भ प्रजासत्ताकदि.१७ मोर्शी:** शिव कावडयात्रा उत्सव समितीतर्फे भव्य कावड यात्रेचे आयोजन ४ ऑगस्ट रोजी सोमवारी करण्याचे ठरविले आहे. शिव कावड कार्यालयाचे उद्घाटन अग्रवाल कॉम्प्लेक्स जयस्तंभचौक येथे नुकतेच पार पडले. या शिव कावड यात्रेचे हे तिसरे वर्ष असून यावर्षी महिलांकरिता विशेष कावडयात्राची व्यवस्था केलीने आहे. यासोबत लेझीम, दिंड्या, लोकनृत्य, भजन पथक, देवी देवताचे नृत्य, महादेवाची मोठी मूर्ती या कावड यात्रेमध्ये सहभागी होणार आहेत.ही कावड यात्रा ४ ऑगस्टला निघणार असून बालाजी मंदिरापासून छत्रपती शिवाजी चौक, जयस्तंभ चौक, रामजीबाबा चौक, पाळा, सालबर्डीतील महादेव महाराज सस्थान या मागनि सालबर्डी येथे महादेवाच्या भुयारात पायदळ जाणार असून यामध्ये सर्व शिवभक्त पायदळ चालून शिव कावड घेऊन भुयारात जातात.त्यानंतर भुयारामध्ये महादेवाची विधीनुसार ओंकारेश्वर येथून आणलेला माँ नर्मदा जलाने अभिषेक करून पूजा व आरती करून ही कावड्यात्रा पूर्णत्व होते.यामध्ये सर्व शिवभक्तांकरिता चहापाणी, नाश्ता व फराळाचे आयोजन सेवाभावी संस्थांकडून जागोजागी केल्या जाते. जयस्तंभचौक येथे फुलांचा वर्षाव शिव कावडवर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नितीन उमाळे यांच्यातर्फे केल्या जाते.

या ठिकाणी अनेक धार्मिक नृत्याचे आयोजन केल्या गेल्यामुळे भाविक गर्दी करीत असतात या कावड यात्रेमुळे मोर्शी शहराचे वातावरण धार्मिक व प्रसन होत असते. या यात्रेमुळे बाहेरगावचे शिवभक्त सहभागीहोण्याकरिता श्रावण महिना असल्यामुळे व सालबर्डीला लहान महादेवाचे महत्त्व असल्यामुळे या कावड यात्रेला खूप धार्मिक महत्त्व आहे. या कावडयात्रेच्या कार्यालयाच्या उदघाटनप्रसंगी डॉ. प्रदीप कुहाडे, रवी गुल्हाने, आप्पा गेडाम, प्रवीण राऊत, अजय आगरकर, नितीन उमाळे, ॲड. आशिष टेकाडे, योगेश गणेश्वर, रवी मोरे, मयूर देशमुख, कमलेश बरहे, गौरठ गुल्हाने, श्रेयस गावंडे, योगेश वानखडे, रवी मोरे, जीवन फंदे, मुकेश आसोलकर, सागर एकोतखाने, सागर हरवाणी, रोशन पाटील, योगेश वानखडे, मुकेश आसोलकर, नितीन बरगट, आकाश शिंदे मनोज खंडारे, नरेश वानखडे, शंकर मोरे आदी उपस्थित होते.

# नागपूर विधानभवनाची विस्तारीत इमारत उभारणार

## भव्यदिव्य इमारतीचा निर्धार




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७नागपूर–** नागपूरमधील विधानभवनच्या इमारतीचे विस्तारीकरण करुन नवी इमारत उभारण्यात येणार असून त्याच्या आराखड्याचे बुधवारी सादरीकरण करण्यात आले. या इमारतीचे काम भव्यदिव्य व्हावे, अशी अपेक्षा विधानसभा अध्यक्ष अँड. राहुल नार्वेकर यांनी यावेळी व्यक्त केली. नागपूर विधानभवनाचे विस्तारीकरण आणि नवीन इमारतीच्या कामासंदर्भात बैठकीचे आयोजन विधानभवनात बुधवारी करण्यात आले होते. त्यास विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र राजे भोसले आदी उपस्थित होते. वास्तुविशारद हाफिज कॉन्ट्रॅक्टर यांनी आराखड्याचे सादरीकरण केले.

नागपूरमधील सध्या अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या जागेवर नवीन सात मजल्याचे संकुल उभारण्यात येणार असून हे विस्तारीकरण करताना सध्याच्या इमारतीची ऐतिहासिक शैली अबाधित राहील, याची काळजी घेण्यात येणार आहे. विस्तारीकरणामध्ये एकाच इमारतीत सेंट्रल हॉल, विधानसभा, विधानपरिषद सभागृह, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, विधानसभा अध्यक्ष, विधानपरिषद सभापती, विरोधी पक्ष नेते यांचे दालन आदी असणार आहेत.

तर शेजारीच मंत्रिमंडळ सदस्यांसाठी वेगळी सहा मजल्याची इमारत उभारण्यात येणार आहे. तसेच वाहनतळ, उपहारगृह, अभ्यागत कक्ष, सुरक्षा कक्ष आदी सुविधा असणार आहेत. तसेच शासकीय मुद्रणालयाची जागा विधीमंडळास मिळाली असून या जागेवर मंत्रालयीन प्रशासकीय कार्यालयांसाठी सुमारे चार लाख चौ.फुटाची चौदा मजली भव्य दिव्य अशी इमारत उभारण्यात येणार आहे. विधानभवन परिसर व प्रस्तावित प्रशासकीय इमारत यांना भुयारी टनेलने जोडण्यात येणार आहे.

नागपूरमधील विधानभवनाच्या इमारतीचे विस्तारीकरण व प्रस्तावित नव्या प्रशासकीय इमारतीचे काम महाराष्ट्र पायाभूत सुविधा महामंडळाच्या मार्फत करण्यात येणार आहे. महामंडळाने यासंबंधीचा सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश विधानसभा अध्यक्ष ड. नार्वेकर यांनी यावेळी दिले.


# नवनित राणा यांना जेसीआयचा वुमन्स ऑफ द इयर अवॉर्ड जाहीर



**विदर्भ प्रजासत्ताकदि.१६अमरावती –**माजी खासदार नवनित राणा यांना जेसीआयच्या पब्लिक रिलेशन कमिटीव्दारा २०२५ चा वुमन्स ऑफ द इयर अवॉर्ड नुकताच घोषित झाला.दरवर्षी जेसीआय संस्थेव्दारे भारतासोबतच जगातील सामाजिक, राजनीतिक तसेच सांस्कृतिक क्षेत्रामध्ये कार्य करणार्या ख्यातनाम व्यक्तीना विविध पुरस्काराव्दारे गौरविण्यात येते. यापूर्वी प्रसिध्द गायिका अनुराधा पौडवाल, पूज्य आचार्य जी. चंदनानी महाराज, अश्विनी भिडे, पंकजा मुंडे, अमृता देवेंद्र फडणवीस, मंजू मंगलप्रभात लोढा, पूनम महाजन अशा विविध क्षेत्रामध्ये कार्य करणार्या ख्यातनाम व्यक्तींना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.नवनीत राणा यांना हा पुरस्कार १४ सप्टेंबरच्या जागतिक पुरस्कार सोहळ्यात प्रदान करण्यात येणार आहे.

# १०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्यांना २६% दर कपात

## ७० टक्के लोकांना फायदा: फडणवीसांची घोषणा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७मुंबई –** महाराष्ट्रात औद्योगिक वीजदर अन्य राज्यांच्या तुलनेत सर्वांत कमी होणार आहेत. आधीच्या टॅरिफ पिटिशनमध्ये रहिवासी ग्राहकांवर भार टाकून इंडस्ट्रियल आणि कमर्शियल दर कमी केले गेले. त्यावर आक्षेप घेतल्याने सगळ्याच कॅटेगरीचे दर कमी झाले आहेत. राज्यात १०० युनिटखाली विजेचा वापर करणारे ७० टक्के ग्राहक असून, त्यांना २६ टक्के दरकपात मिळणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी विधान परिषदेत दिली.

आ. अभिजीत वंजारी यांनी प्रश्नोत्तराच्या तासात वीज दर कमी करण्याबाबत कोणती उपाययोजना केली आहे, असा सवाल केला, तर विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी, औद्योगिक वीज दरासोबतच शेतकऱ्यांना होणाऱ्या विजेच्या दराची बाब निदर्शनास आणत कालबाह्य वीज मीटर बंद पडल्यानंतरही शेतकऱ्यांना लाखोंची बिले येत आहेत, याकडे लक्ष वेधले.मेरिट ऑर्डर डिस्पॅच' पद्धतीने विद्युत खरेदी केली जाणार असल्यामुळे खासगी कंपन्यांकडून स्वस्त दरात वीज खरेदी केली जाते. सोलर, विंड आणि बॅटरी स्टोअरेजच्या वापरामुळे विजेच्या खरेदीची किंमत मोठ्या प्रमाणात घटली आहे. हे करार २५ वर्षांचे असल्यामुळे विजेचे दर स्थिर राहतील, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

नवीन टॅरिफनुसार सध्या महाराष्ट्राचा दर ८.३२ रुपये असून, तो पुढील टप्प्यात ७.३८ रुपयांवर येणार आहे. टॅरिफ ट्रू-अप प्रक्रियेमुळे वीज दर वाढणार नाहीत.

### कृषी क्षेत्रातही आता स्मार्ट मीटर बसविणार

शेतकऱ्यांना गरजेनुसार १० एचपी हॉर्स पॉवरचे सोलर पंप देण्याची तयारी आहे. कृषी क्षेत्रात स्मार्ट मीटर व वीज वापरावर नियंत्रण असावे, यासाठी स्मार्ट मीटर लावले जाणार आहेत. यामुळे शेतीसाठी नेमकी किती वीज वापरली जाते, हे समजणे शक्य होणार असून, भविष्यकालीन धोरण आखण्यास मदत होईल, असेही त्यांनी सांगितले.

# जिल्ह्यातील बालगृहांवर आली उपासमारीची वेळ
# १८ महिन्यांपासून दमडीही मिळाली नाही

## चिमुकल्यांवर उपाशी राहण्याची आली वेळ : राजकीय नेते लक्ष देतील का?

महिला व बाल विकास विभाग

### जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींचेही दुर्लक्ष

जिल्ह्यातील १३ बालगृहे आहेत. त्यापैकी ५ बालगृहे बंद पडली आहेत. डॉ. वाडेकर, सदाशांती बालगृहाचे संचालक डॉ. इंगळे, महात्मा फुले बालगृहाचे संचालक उमाळे, अधीक्षक राहुल नवघरे आदींनी पुढाकार घेऊन जिल्हाध्यक्ष गजानन देशमुख यांच्या नेतृत्वात शासन दरबारी अनेकदा हा प्रश्न रेटला. बालविकास अधिकारी मरसाळे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अजय डवले यांच्यापुढे ही समस्या मांडली: मात्र अद्यापही तोडगा निघालेला नाही. अत्यंत गंभीर प्रश्नांकडे जिल्ह्यातील लोकप्रतिनिधीचेही दुर्लक्ष होत आहे.

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

प्रशासकीय लालफितशाही किती वाईट परिणाम करू शकते, याचा अनुभव जिल्ह्यातील निराधार, निराश्रीत चिमुकल्यांना येत आहे. गेल्या तब्बल १८ महिन्यांपासून या चिमुकल्यांसाठी असलेला निधी बालगृहांना मिळाला नाही. त्यामुळे चिमुकल्यांवर आता उपाशी राहण्याची वेळ आली आहे.महिला व बालविकास विभागातर्फे बालगृहांची शृंखला चालविण्यात येते.समाजातील निराधार व निराक्षीत चिमुकले याठिकाणी वयाची १८ वर्षे होईपर्यंत राहतात. शासनातर्फे बालगृह संचालकांना त्यासाठी ठरवून देणारा निधीदेण्यात येतो. बालगृहाचे संचालक पोटच्या मुलाप्रमाणे या चिमुकल्यांची काळजीही घेतात. त्यापोटी कर्मचाऱ्यांना मानधनसुध्दा शासनातर्फे दिल्या जाते: मात्र गेल्या १८ महिन्यांपासून शासनाने या बालगृहांना एक रुपयाही दिलेला नाही.कर्मचाऱ्यांचे मानधनही थकलेले आहे. बाजारात किराणा दुकानदार आता बालगृहाच्या संचालकांना उधारीत माल देण्यास तयार नाही. त्यामुळे समाजातील दानशूर, दानदात्यांकडे हात पसरण्याची वेळ या संचालकांवर आली आहे.



शासनाने संस्था वाऱ्यावर सोडल्यासमाजाने डावललेल्या चिमुकल्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची किमया बालगृह साकारीत आहेत. बालगृहातून अनेकांना नवी दिशा गवसली आहे. असे असतानाही शासनाने मात्र बालगृहांना वाऱ्यावर सोडले आहे, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.

**गजानन देशमुख**
**जिल्हाध्यक्ष**
**संस्थाचालक,**
**कर्मचारी संघटना.**

# जिल्ह्यात युरिया आणि डीएपी खताचा संरक्षित साठा शेतकऱ्यांसाठी खुला

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची जिल्हाधिकाऱ्यांना सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ अमरावती**

खरीप हंगामासाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांकरिता युरियासह डीएपी रासायनिक खतांचा संरक्षित साठा - खुला केला आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनेनुसार जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी चिखलदरा, धारणीतील युरिया, डीएपी खताच्या मागणी संदर्भात बैठक घेतली होती. खरीप ५. हंगामासाठी युरियाचा साठा संरक्षित ठेवण्यासाठी दि विदर्भन को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन की लिमिटेड, नागपूर, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित' यांची नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती केले. जिल्ह्यात १८६०.६०५ मेट्रिक टन युरिया, ८०८.४५ मेट्रिक टन डीएपीचा साठा या संस्थांमार्फत संरक्षित केला आहे. शेतकऱ्यांच्या गरजेनुसार युरिया डीएपीचा संरक्षित साठा मुक्त करण्यास



जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी ९ जुलैला मान्यता दिली आहे. पालकमंत्र्यांच्या आदेशानुसार, जिल्ह्यातील तालुकानिहाय युरियाचा साठा वितरीत करण्यात येणार आहे. अचलपूर: ७० मेट्रिक टन, दापूर १२० मेट्रिक टन, चांदूर बाजार ५० मेट्रिक टन, अमरावती ४० मेट्रिक टन, चिखलदरा १०० मेट्रिक टन, भातकुली ४० मेट्रिक टन, नांदगाव खंडेश्वर ४० मेट्रिक टन, अंजनगाव सुर्जी १०० मेट्रिक टन, घारणी १४० मेट्रिक टन, तिवसा ४० मेट्रिक टन, चांदूर रेल्वे ३० मेट्रिक टन, मोशी ८० मेट्रिक टन, क्रूड ८० मेट्रिक टन युरिया वितरित केला जाईल. जिल्ह्यात एकूण ९३० मेट्रिक टन युरियाचा साठा आता विक्रीसाठी उपलब्ध होईल. मुक्त करण्यात आलेला हा रासायनिक खतांचा साठा तातडीने शेतक-यांना विक्री करण्यासाठी उपलब्ध करून देण्यात यावा, असे निर्देश कृषी विकास अधिकारी एम. जे. ताडकर आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी दिले आहेत.



# झेनिथ हॉस्पिटलचा अभिमानास्पद टप्पा

## अमरावतीत १०० हून अधिक हृदय बायपास शस्त्रक्रिया यशस्वी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

अमरावतीतील झेनिथ हॉस्पिटलने वैद्यकीय क्षेत्रात अभिमानास्पद टप्पा गाठत आतापर्यंत १०० हून अधिक हृदय बायपास शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केल्या आहेत. ही गुंतागुंतीची हृदय शस्त्रक्रिया यापूर्वी रुग्णांना नागपूर, पुणे वा मुंबई येथे जाऊन करून घ्यावी लागत होती. मात्र आता ती सुविधा अमरावतीतच उपलब्ध झाल्याने स्थानिक रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे.

हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या धमन्यांमध्ये अडथळा आल्यास 'कोरोनरी आर्टरी बायपास ग्राफ्टिंग' ही शस्त्रक्रिया केली जाते. यामध्ये पर्यायी रक्तवाहिनी जोडून हृदयाचा रक्तप्रवाह सुरळीत केला जातो. ही प्राणवाचक शस्त्रक्रिया आधुनिक पद्धतीने आणि तज्ज्ञांच्या देखरेखीखाली झेनिथ हॉस्पिटलमध्ये यशस्वीपणे पार पाडली जात आहे.

इंटरव्हेन्शनल कार्डियोलॉजिस्ट डॉ. नीरज राघानी यांच्या मार्गदर्शनाखाली अँजिओग्राफीपासून शस्त्रक्रियेनंतरच्या निगेपर्यंतची प्रक्रिया आंतरराष्ट्रीय दर्जाने पार पडते. अत्याधुनिक कार्डियाक ऑपरेशन थिएटर, खउण सुविधा आणि अनुभवी कार्डियाक टीम यामुळे रुग्णांना दर्जेदार सेवा मिळत आहे.रुग्णांनी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी हॉस्पिटलच्या उपचारपद्धती व डॉक्टरांच्या संवेदनशीलतेबद्दल समाधान व्यक्त केले असून, अनेक रुग्णांनी शस्त्रक्रियेनंतर सुधारित जीवनशैलीकडे वाटचाल केली आहे.झेनिथ हॉस्पिटलने अमरावतीसारख्या शहरात उच्च दर्जाची हृदय शस्त्रक्रिया उपलब्ध करून दिली असून, ते हृदयविकाराच्या रुग्णांसाठी आशेचा नवा किरण ठरले आहे.

# जगण्यातील विरोधाभास समजून घेण्याची गरज : डॉ. आवलगावकर

## विरक्त नदीचा काठ कवीता संग्रहाचे प्रकाशन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

अलीकडच्या काळात माणूणसपण हरवत चालले आहे. जगाची विदीर्ण अवस्था झाली आहे. अशा काळात प्रत्येकाने जगण्यातील विरोधाभास समजून घेण्याची गरज आहे. संताची शिकवण नव्याने लक्षात घेण्याची नितांत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन रिद्धपुर येथील मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. अविनाश आवलगावकर यांनी केले. यशवंतराव चव्हाण सेंटर, अमरावती जिल्हा आणि मराठी विभाग श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने प्रख्यात लेखक, कवी, चित्रकार, पत्रकार सुनील यावलीकर यांच्या विरक्त नदीचा काठ या कवीता संग्रहाचे प्रकाशन आज बुधवारी स्थानीक शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख सभागृहात पार पडले. यावेळी ते डॉ. आवलगावकर



बोलत होते.कार्यक्रमाच्या व्यासपीठावर सुप्रसिद्ध कवियत्री, साहित्यिक डॉ. प्रभा गणोरकर, लेखक डॉ. रमेश अंधारे विराजमान होते. पुढे बोलतांना कुलगुरु डॉ. अविनाश आवलगावकर म्हणाले की, जीवनाची गती प्रवाहीत करणारे साहीत्य श्रेष्ठ असते. सुनील यावलीकर यांच्या कवीता संग्रहातील कवीता या जीवन प्रवाहीत आहेत. सुनील यावलीकर चिंतनशील कवी, चित्रकार असून ते जीवनावकडे गांभर्याने पाहत असतात. त्यांच्या चित्रातून कवीता तर कवितांमधून चित्राचे प्रकटीकरण होत असते. त्यांनी त्यांच्या कवीतांमधुन चित्राचा आदर केला आहे. ते उत्तम समीक्षक देखील आहेत. त्यांनी माणसाचे समीक्षण केले आहे. सध्या माणूस हरवित चालला आहे. हाच शोध यावलीकर यांनी त्यांच्या कवीतामधून घेतला आहे. आयुष्यातील विरोधाभास त्यांनी समर्थपणे मांडला आहे. कवीता ही चार ओळीची असली तरी ती संपूर्ण पुस्तकाचा आशय मांडणारी असते.धर्म व अंधश्रद्धा यांची गल्लत झाली आहे. ज्या संतांनी अंधश्रद्धेवर प्रहार केला आहे. त्याच संतांना आपण अंधश्रद्धेच्या शिखरावर बसविले आहे. संतांची शिकवण आपण आता पुन्हा समजून घेतली पाहिजे. किती लोकांनी पुराण व उपनिषद वाचली आहेत, हा प्रश्न उपस्थित होतो. यासाठी प्रत्येकाने चिंतन करायला पाहिजे. सुनील यावलीकर यांच्या कवीता चिंतन करायला लावणाऱ्या आहेत. जीवनावकडे गांभीर्याने पाहण्याचा दृष्टीकोण देणारा विरक्त नदीचा काठ हा कवीतासंग्रह प्रत्येकाने वाचून, समजून घ्यावा असे आवाहन कुलगुरु डॉ. अविनाश आवलगावकर यांनी यावेळी केले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. पंजाबराव देशमुख व संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर कवीतासंग्रह या पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन संदीप देशमुख, प्रास्ताविक ज्ञानपथ पब्लिकेशनचे सुशील सुकलकर यांनी तर आभार प्रा.डॉ. राजेश मिरगे यांनी केले.कार्यक्रमाला साहित्यिक वसंत आबाजी डहाके, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या मराठी विभाग प्रमुख डॉ. सुवर्णा गाडगे, साहित्यिक प्रोसर डॉ. संजय खडसे, कवी अशोक थोरात, भालचंद्र रेवणे, विष्णू सोळंके, ज्येष्ठ पत्रकार शशीकांत ओहळे, अनिल जाधव, वैखरी यावलीकर, प्रा.डॉ. शोभा रोकडे, दिलीप काळे, पी.आर. राजपूत, डॉ. हेमंत खडके, शशांक लावरे, प्रा.अविनाश भाकरे आदी उपस्थित होते.

**समकालीन जीवनाचा वेध : डॉ. गणोरकर**

सुनील यावलीकर यांच्या विरक्त नदीचा काठ या कवीता संग्रहातील कवीतांमधून समकालीन जीवनाचा वेध घेण्यात आला आहे. या कवीतांमधुन आत्मानुभवाचा स्पर्श होत असल्याचे जाणवते. जीवनाचा विचार करणाृया या कवीता चिंतनशील असल्याचे कवियत्री व साहित्यिक डॉ. प्रभा गणोरकर यांनी आपल्या मनोगतामध्ये सांगितले. तर सध्या होणारा मूल्यांचा ऱ्हास यावलीकर यांच्या कवीतांमधून दिसून येत असल्याचे डॉ.रमेश अंधारे यांनी सांगितले.

जीवन प्रवाहाचे चित्रणनदी ही शांत, संथ, निश्चयी, स्थिर, आनंद देणारी, तृप्त करणारी, मोठा परिघ असणारी असते. नदी जीवनाचे प्रतीक असते. परंतु ती विरक्त देखील असते. हा विरोधाभास आहे. आयुष्य देखील अशाच विरोधाभासाचे आहे. आनंदी जिवनात अवस्थता व इतर दुसऱ्या या बाबी असतात. विरक्त नदीचा काठ यातून विरोधाभासी बाबी ठळकपणे पुढे येत असल्याचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांनी सांगितले.

# मेळघाटातील मुख्य शासकीय कार्यालय प्रभारीवर

## आदिवासी प्रकल्प, महसूल पोलीस ,नगरपंचायत विभागाचा समावेशनियमित शासकीय कामकाजावर होत आहे परिणाम : आमदार खासदार जिल्हाधिकारी लक्ष देतील का?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७धारणी**

मेळघाटातील धारणी तालुक्यात आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय , उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय व नगरपंचायत कार्यालय ही मुख्य कार्यालय प्रभारीवर असल्यामुळे शासकीय कामकाजावर त्याचा मोठ्या परिणाम होत असल्याने नियमित अधिकारी देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे




मेळघाटातील आदिवासी बांधवांच्या सर्वांगीण विकासाकरिता जिल्ह्याचे आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय धारणी शहरात आहे त्या कार्यालयात आयएएस दर्जाच्याअधिकार्याची नियुक्ती मंत्रालयीन स्तरावरून केल्या जाते मागील दोन महिन्यापासून या कार्यालयात कार्यरत असलेल्या आयएस अधिकारी प्रियवंदा महांदळकर ह्या सध्या स्थितीत दीर्घ रजेवर गेल्यामुळे तेथील प्रभार हा अकोल्याचे प्रकल्प अधिकारी मोहनकुमार व्यवहारे यांच्याकडे देण्यात आला आहे तर त्यांच्याकडे असलेला धारणी उपविभागीय अधिकारी यांचा सुद्धा प्रभार तहसीलदार प्रदीप शेवाळे यांच्याकडे आहे तर मागील दोन वर्षापासून धारणी येथे असलेले उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय हे तत्कालीन आयपीएस पोलीस अधिकारी गौर हसन यांच्या बदलीनंतर दोन वर्षापासून प्रभारी अधिकाऱ्यावर चालत आहे त्याच्याच बाजूला लागून असलेले धारणी नगरपंचायत चे कार्यालय त्याची सुद्धा अशीच दयनीय अवस्था झाली असून दोन वर्षांपूर्वीचे तत्कालीन मुख्याधिकारी हर्षल सोनवणे यांची बदली झाल्यानंतर या नगरपंचायतला ग्रहण लागल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे अद्यापपर्यंत नगरपंचायत मध्ये चार ते पाच मुख्याधिकारी यांनी प्रभार घेऊन कामकाज बघितले या सर्व पकार्यालयात नियमित अधिकारी नसल्याने कामकाज नियमित व वेळेवर होत नसल्याने धारणीतील जनता ही संतुष्ट नाही त्यासह शहरात व ग्रामीण भागात अनेक समस्यांना नागरिकांना समोर जावे लागते तर समस्या कार्यालयात घेऊन आल्यानंतर प्रभारी अधिकारी कार्यालयात हजर नसल्याने ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांना शासकीय कार्यालयात येरझारा कराव्या लागते त्यामुळे नियमित चालू असलेल्या कामकाजावर मोठ्या प्रमाणात फरक नागरिकांना जाणवत असल्याने नियमित अधिकारी देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.याबाबत अनेक नागरिकांच्या तक्रारी माझ्याकडे आल्या आहे पालकमंत्र्याकडे व जिल्हाधिकारी यांच्याकडे आदिवासी नागरिकांना शासकीय कार्यालयात येरझारा कराव्या नाही लागणार या करता नियमित अधिकारी देण्याची मागणी करणार आहे

# अकरावीची प्रवेश प्रक्रिया ऑफलाइन करा

## ग्रामीण भागात स्थानिक महाविद्यालयातील विद्यार्थी इयत्ता अकरावीच्या प्रवेशापासून वंचित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

तालुका, ग्रामीण भागातील वर्ग अकरावीची प्रवेश प्रक्रिया ऑफलाइन करावी. स्थानिक विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्य प्रवेश द्यावे, अशी मागणी ठाकरे गट शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांनी शिक्षण मंत्री भुसे, विभागीय शिक्षण उपसंचालकांना निवेदनाद्वारे केली.

यावर्षी पासून वर्ग अकरावीची प्रवेश प्रक्रिया शासनाने ऑनलाइन केली. यामध्ये स्थानिक विद्यार्थी प्रवेशा पासून वंचित राहत आहे, येथील वर्ग दहावीत सुमारे चारशेवर विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विज्ञान, कला, वाणिज्य या शाखेत प्रत्येकी ६० विद्यार्थी प्रमाणे १८० विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार इतर विद्यार्थ्यांनी वर्ग ११वीला प्रवेश घ्यावा कुठे असा प्रश्न आहे. यापूर्वी ऑफलाइन प्रवेश प्रक्रियेत गुणवत्तेनुसार ६० विद्यार्थ्यांना प्रवेश,



२० शिक्षणाधिकारी ४० शिक्षण उपसंचालकांच्या मान्यतेनुसार १२० विद्यार्थ्यांना एका वर्गात प्रवेश मिळत असे. त्यामुळे स्थानिक विद्यार्थ्यांना यात प्रवेश मिळायचा. परंतु, ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमुळे स्थानिक विद्यार्थ्यांची चिंता वाढली असून, तालुक्यात विज्ञान शाखेची अनुदानित तुकडी शिवाजी महाविद्यालयात असून ग्रामीण विद्यार्थी जिल्ह्याच्या ठिकाणी परिस्थिती अभावी शिकायला जाऊ शकत नाही. म्हणून वर्ग अकरावीची प्रवेश प्रक्रिया ऑफलाइन राबवावी. त्यात स्थानिक विद्यार्थ्यांना प्रथम प्रवेश द्यावा. अशी मागणी प्रकाश मारोटकर यांनी केली आहे. अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया ही विद्यार्थ्यांकरिता डोकेदुखीची झाली आहे. यामध्ये अनेक तांत्रिक अडचणी जात असून, यात स्थानिक विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित राहावे लागत आहे. म्हणून पूर्वी प्रमाणे ऑफलाइन प्रवेश पद्धत राबवावी. स्थानिक विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा. अन्यथा तीव्र आंदोलन छेडावे लागेल. असे प्रकाश मारोटकर यांनी सांगितले.

# कोण्या जोकरने लिहिले हे शपथपत्र? उच्च न्यायालयाची पीडब्लुडी विभागावर तीव्र टीका

## इतवारा बाजार उड्डाणपुलाच्या रखडलेल्या कामावरून न्यायालयाचा संताप; मुख्य अभियंत्यांना न्यायालयात हजर राहण्याचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

गेल्या सात वर्षांपासून रखडलेल्या इतवारा बाजार उड्डाणपुलाच्या प्रकरणात नागपूर खंडपीठाने बुधवारी सुनावणीदरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागावर (झथऊ) जोरदार फटकारा लावला. विभागाच्या वतीने दाखल करण्यात आलेले शपथपत्र अतिशय ढिसाळ असल्याचे नमूद करत न्यायालयाने कोण्या जोकरने लिहिले हे उत्तर? अशी तीव्र मौखिक टीका केली.

ही जनहित याचिका माजी



पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी दाखल केली असून, यामध्ये कामाच्या विलंबाविषयी तपशीलवार माहिती दिली आहे. ३ जानेवारी २०२० पर्यंत उड्डाणपूल पूर्ण होणे अपेक्षित असतानाही, २०२५ पर्यंतही काम अपूर्णच आहे.

सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती नितीन सांबरे व न्यायमूर्ती सचिन देशमुख यांच्या खंडपीठाने म्हटले की, सात वर्षे झाली तरी काम पूर्ण झाले नाही, एवढ्या काळात तर कंत्राट रद्द करायला हवे होते. कंत्राटदाराने गर्दी आणि ट्राफिकची कारणे दिली, पण ही कारणे जुजबी व पूर्वनियोजित असावीत, कारण हे सर्व तर सुरुवातीपासून माहित होते.सार्वजनिक बांधकाम विभागाने सहाय्यक अभियंत्यामार्फत शपथपत्र सादर केल्याने न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली. मुख्य अभियंता ऐवजी कनिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत उत्तर देणे म्हणजे न्यायालयीन प्रक्रियेची थट्टा असे निरीक्षण नोंदवण्यात आले.न्यायालयाने मुख्य अभियंता अमरावती यांना सर्व कागदपत्रांसह न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिले असून, समाधानकारक उत्तर न दिल्यास झथऊ सचिवांनाही न्यायालयात बोलवले जाऊ शकते, असा इशारा देण्यात आला आहे.डॉ. सुनील देशमुख यांनी न्यायालयाच्या या ठाम भूमिकेचे स्वागत केले असून, आता तरी हे काम तातडीने पूर्ण होऊन अमरावतीकरांना त्रासमुक्त करता यावा, असे प्रतिपादन केले.

# सहा हरियाल पक्ष्यांची जंगलात भरारी ३ तस्करांवर वनगुन्हा दाखल

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१७अचलपूर

अनुसूची २ मध्ये समाविष्ट असलेल्या हरियाल पक्ष्यांची तस्करी करणाऱ्या मनोहर पारिसे, विक्की नांदणे, प्रज्वल आमझरे रा. सर्व विसळपूर्णा ता. चांदूरबाजार यांच्याविरुध्द वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ चे कलम ९,४८,५०,५१,५७ अन्वये तपास सूरू आहे. गुप्त माहितीवरून वनपरिक्षेत्र अधिकारी व पथकाने १२ जुलै २५ रोजी ६ हरियाल पक्षी, पक्षी पकडण्यासाठी वापरण्यात आलेले जाळे व उपरोक्त तीनही आरोपींना ताब्यात घेतलेहोते. सर्व सहाही पक्षांना जंगलात सुरक्षितरित्या सोडण्यात आले.६ हरियाल पक्ष्यांना जाळे टाकून पकडण्यात आल्याची गुप्त माहिती वनविभागाला प्राप्त झाली होती. वनविभागाच्या अनुसूची २ मध्ये सदर पक्षी समाविष्ट असल्याने



वनविभागाने अत्यंत तातडीने घटनास्थळ गाठून आरोपीसह सहा पक्ष्यांना ताब्यात घेतले. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. चंद्रकांत धंदर यांनी सर्व पक्ष्यांची वैद्यकीय तपासणी करून पक्ष्यांची सुदृद्धता पाहत त्यांना नैसर्गिकवातावरणात जंगलात सोडण्यातआले. तस्करी प्रकरणातील तीनही आरोपींना ताब्यात घेत वनाधिकाऱ्यांकडून चौकशीअंती वनगुन्हा दाखल करण्यात आला आहे तसेच त्यासंदर्भात न्यायालयालासुद्धा माहिती देण्यात आली असल्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी दिनेश वाळके यांनी सांगितले आहे. सर्व आरोपी चौकशीसाठी सहकार्य करीत असल्याने आरोपींची वन कोठडी घेण्याचा निर्णय घेतला गेला नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. सदर पक्षी आपण पाळण्यासाठी पकडले असल्याचे आरोपींनी आपल्या सांगितल्याचे समजते. बयाणातउल्लेखनीय म्हणजे हरियाल हा पक्षी जमिनीवर फार काळ रमत नाही. त्यामुळे सदर पक्ष्याचे वास्तव्य झाडांवरच असते. हा पक्षी दिसायला सुंदर आहे. अशा वैशिष्ट्यामुळे सदर पक्ष्याला सूची २ मध्ये ठेवण्यात आले आहे. या पक्ष्याचे जतन व्हावे, असे निसर्गप्रेमी आणि वनविभागाला वाटते. अशा पक्ष्यांची संख्या कमी होऊ नये, या दृष्टिकोनातून सदर पक्ष्याला पकडणे किंवा तस्करी करणे यासाठी कठोर कायदे करण्यात आले आहे. आरोपीला ३ वर्षे सजा होऊ शकतेः मात्र वनपरिक्षेत्र कार्यालयांतर्गत हरियाल पक्षी असुरक्षित असल्याचा प्रकार या घटनेमुळे पुढे आला आहे. सदर पक्षी जमिनीवर फारसे येत नसल्यामुळे या पक्षाला पकडणे सोपे नाही. पारंगत आणि अनुभव संपन्न असलेलेतस्करच झाडावर जाळे टाकूनया पक्ष्यांना पकडून तस्करी करतात. या पक्षाला पकडून तस्करांना काय साध्य करावयाचे होते, याचा शोध घेण्याचे आव्हान वनाधिकाऱ्यांवर आहे.

वनप्रेमींना धक्कापक्ष्यांवर प्रेम करणाऱ्या निसर्गप्रेमींसाठी ही घटना धक्कादायक ठरली आहे. हरियाल पक्ष्यांची संख्या टिकवण्यासाठी आणि निसर्गसंतुलन राखण्यासाठी अशा प्रकारच्या तस्करीवर कठोर कारवाई करण्याची मागणी आता होत आहे.

**तस्करांचा हेतू काय?**

सदरील पक्षी तस्करीमागे नेमका उद्देश काय होता, याचा तपास सुरू आहे. कारण हरियाल पक्ष्यांना पकडणे सोपे नसते, हे काम केवळ अनुभवी तस्करच करू शकतात.

आरोपींकडून चौकशीला सहकार्यतीनही आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले असून न्यायालयाला माहिती देण्यात आली आहे सर्व पक्ष्यांना नैसर्गिक वातावरणात जंगलात सोडण्यात आले आहे.

**दिनेश वाळके,**
**वनपरिक्षेत्र अधिकारी प्रादेशिक परतवाडा**

# राहुल नगरात वृद्धाच्या घरातून मोबाईल चोरणाऱ्या तरुणीला काही तासातच अटक

## ७३ हजारांचे चार मोबाईल जप्त, फ्रेजरपुरा पोलिसांची कारवाई



विदर्भ प्रजासत्ताक
दि.१७अमरावती

राहुल नगर परिसरात एका वृद्धाच्या घरात घर भाड्याने आहे का? असा बहाणा करत शिरलेल्या तरुणीने मोबाईल लंपास केल्याची घटना घडली. फेजरपुरा पोलिसांनी केवळ तीन तासांत संशयित महिलेला अटक करून तिच्याकडून ७३ हजार रुपये किमतीचे चार मोबाईल जप्त केले.१५ जुलै रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास राहुल नगरातील ७६ वर्षीय हरीगोविंद पोचगे यांच्या घरी एक अंदाजे १८ वर्षीय तरुणी आली. काळ्या टीशर्ट व ग्रे नाईट पँटमध्ये असलेल्या तरुणीने घर भाड्याने आहे का? असा प्रश्न विचारला. पोचगे यांनी घर उपलब्ध नसल्याचे सांगताच ती तेथून निघून गेली. थोड्याच वेळात त्यांनी पाहिले असता टीपॉयवर ठेवलेला पोको ए-७ मोबाईल अंदाजे किंमत १३ हजार रुपये गायब असल्याचे लक्षात आले. पोचगे यांनी तात्काळ फेजरपुरा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तपासात पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी महिलेला हुशारीने शोधून काढले व अटक केली. तिच्याकडून चोरी गेलेल्या मोबाईलसह आणखी तीन मोबाईल जप्त करण्यात आले.यावेळी आरोपी तरुणीच्या ताब्यातून एक ओप्पो कंपनीचा मोबाईल अंदाजे किंमत २० हजार रुपये,पोको मोबाईल अंदाजे किंमत २२ हजार रुपये, पोको --७ अंदाजे किंमत १३ हजार रुपये आणि सॅमसंग गॅलेक्सी अंदाजे किंमत १८ हजार रुपये असाएकूण ७३ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे, सहायक आयुक्त कैलास पुडंकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि रोशन सिरसाट व त्यांच्या पथकाने केली. पुढील तपास सुरू आहे.

# जनसुरक्षा कायद्याविरोधात काँग्रेसचे जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन

## महायुती सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी



विदर्भ प्रजासत्ताक
दि.१७अमरावती :

राज्यातील जनसुरक्षा कायद्याच्या विरोधात आज अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर काँग्रेस पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले. काँग्रेस खासदार बळवंत वानखडे आणि माजी मंत्री यशोमती ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले.

या आंदोलनात काँग्रेस कार्यकर्त्यांनी महायुती सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. हा देश सर्वधर्मसमभाव मानणारा आहे. विचार मांडण्याचा अधिकार हिरावून घेणे म्हणजे हिटलरशाही आणि दडपशाही आहे, अशा तीव्र शब्दांत यशोमती ठाकूर यांनी राज्य सरकारवर टीका केली.जनसुरक्षा कायदा लोकशाहीला तळा देणारा असून, तो रद्द झाला नाही, तर उद्या संपूर्ण महाराष्ट्र रस्त्यावर उतरेल. लोकांचे हक्क कुचकटणारा हा कायदा आम्ही सहन करणार नसल्याचे यशोमती ठाकूर म्हणाल्या

या आंदोलनामुळे परिसरात तणावाचे वातावरण होते. पोलिसांचा मोठा बंदोबस्त देखील तैनात करण्यात आला होता.याप्रसंगी प्रामुख्याने जिल्ह्याचे खासदार बळवंत वानखडे,माजी पालकमंत्री ड.यशोमतीताई ठाकूर,माजी पालकमंत्री डॉ.सुनील देशमुख,अमरावती शहर काँग्रेस कमिटी अध्यक्ष बबलु शेखावत,माजी महापौर विलास इंगोले,माजी महापौर मिलिंद चिमोटे,प्रदेश प्रवक्ते दिलीप एडतकर,महिला काँग्रेस अध्यक्षा जयश्री वानखडे,माजी स्थायी समिती सभापती बाळासाहेब भुयार,युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष नीलेश गुहे,युवक काँग्रेस अमरावती विधानसभा अध्यक्ष वैभव देशमुख,माजी नगरसेवक मुन्ना राठोड,उपाध्यक्ष संजय वाघ,महासचिव विनोद मोदी,माजी महापौर अशोक डोंगरे,माजी महापौर वंदना कंगाले,कीर्तीमाला चौधरी,वंदना थोरात,अनिला काझी,शिल्पा राऊत,अस्मा परवीन कलाम ठेकेदार,भारती क्षीरसागर,नेहा बागडे,सलीम बेग,प्रदीप हिवसे,विजय वानखडे,सुनील जावरे,गजानन जाधव,फिरोज शाह,समीर जवंजाळ,डॉ.मतीन अहेमद,राजीव भेले,गजानन राजगुरे,डॉ.संजय शिरभाते,गजानन रडके,डॉ. आबीद हुसैन,शेख अफजल चौधरी,अनिल माधोगढीया,सतीश मेटांगे,रमेश राजोटे,अभिनंदन पेंढारी,किरण साऊरकर,विकास धोटे,अरुण बनारसे,अरुण जयस्वाल,विजय चौधरी,मोहम्मद साबीर,शाहीन शाह,विजय खंडारे,विजय बर्वे,मोहम्मद निजाम,भैय्यासाहेब निचळ,अमर देशकर,सतीश काळे,नितीन काळे,संकेत साहू,सौरभ तायडे,शुभम बांबल,स्वप्नील साव,सोमेश्वर गौड,उमेश घोडकी,रोहन चिमोटे,तुषार राऊत,संजय मोरे, मोहम्मद शरीफ शेख हबीब,शेख मुश्ताक,किशोर पाटील,अतुल काळबेंडे,संजय बोबडे,प्रकाश पहूरकर,विक्की वानखडे,राजेश उपलकर,नाना बारबुद्धे,अक्रम अली,इस्रार आलम,अजय कुबडे,प्रशांत मोखडे,चेतन कांडलकर,सूरज खैरे,प्रथमेश गावंडे,अशोक राऊत, जे.जे.मडावी,छत्रपती राऊत,सुभाष चव्हाण,हिरामण गावंडे,जगदीश तायडे,रवी ढोले,गवई साहेब,किर्दक साहेब यांचे सह असंख्य पदाधिकारी कार्यकर्ते मान्यवर उपस्थित होते.

# मोझरी विकास आराखड्याबाबत लवकरच बैठक - अजित पवार

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१७मुंबई

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त मोझरी क्षेत्रात मूलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी १५० कोटी रुपयांच्या मूलभूत विकास आराखड्यास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तथापि या विकास आराखड्याअंतर्गत बांधण्यात येणाऱ्या इमारतींपैकी तीन इमारती कोणाला हस्तांतरित करायच्या, त्यातील शैक्षणिक संकुल कोण व्यवस्थितपणे चालवू शकेल हे तपासून पाहण्यात येईल आणि यासंदर्भात संस्थेचे प्रमुख आणि स्थानिक



लोकप्रतिनिधी यांच्यासमवेत पुढील १५ दिवसात बैठक घेऊन मार्ग काढण्यात येईल,अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली. विधानसभा सदस्य राजेश वानखेडे यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना ते बोलत होते. श्री क्षेत्र मोझरी विकास आराखड्यांतर्गत सुरू असलेल्या कामांपैकी शैक्षणिक संकुल, भक्तनिवास, ग्रामविकास प्रबोधिनी आणि विशेष अतिथिगृह या इमारती हस्तांतरित करण्याची अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ,श्रीक्षेत्र गुरुकुल आश्रम या संस्थेने मागणी केली आहे. तथापि या इमारतींपैकी फक्त एका इमारतीचे मुख्य प्रवेशद्वार आणि रस्त्याचे बांधकाम श्री गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज आश्रम संस्थेच्या जागेत असून प्रत्यक्षात उर्वरित इमारतींचे बांधकाम शासनाच्या जागेत करण्यात आलेले आहे. संस्थेने ही ५.७० हेक्टर आर जमीन शासनाच्या नावे हस्तांतरित केलेली नाही,अशी माहितीही यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

# नगरपरिषदेच्या सफाई मंजूर कामगारांच्या जिवाशी खेळ

## मजुरांना सुरक्षा कवच नसताना कंत्राटदाराने उतरवले कुजलेल्या खोल खड्ड्यात

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१७अंजनगाव सुर्जी

अंजनगाव सुर्जी नगरपरिषद कार्यक्षेत्रात सध्या सर्वत्र मोठ्या प्रमाणात नालेसफाई सुरू आहे. मात्र, ती करणाऱ्या सफाई कामगारांकडे योग्य ते संरक्षणात्मक साहित्य तसेच सुविधा नसल्याने ही नालेसफाई म्हणजे सफाई कामगारांच्या जीवाशी खेळ असल्याचे दिसत आहे. नविन बसस्थानक परिसरातील भलामोठा खड्ड्यातील साफसफाई स्थानिक प्रशासनाने चालू केली



असून या कामांवरील मजुरांच्या जिवाशी खेळ प्रशासन करीत आहे.या खड्ड्यातील साफसफाई करताना व गाळ काढताना विषारी वायूमुळे आणि प्राणवायूअभावी सफाई मजूरांना आपले प्राण गमवाण्याची शक्यता नाकारता येत नाही अशा अनेक घटना राज्यात घडल्या आहे. सफाई कामगार कुजलेल्या कचऱ्यामुळे व त्यातील रोगजंतूंमुळे सतत आजारी पडत आहेत. त्यांना कोणीही वाली नाही. या गरीब मजूर कामगारांसाठी तोंडाला मास्क, प्लास्टिक-रबराचे हातमोजे आणि प्राणवायूचे सिलिंडर याचा पुरवठा करण्याची जबाबदारी घनकचरा व्यवस्थापन कंत्राटदारांवर असताना कंत्राटदाराने दुर्लक्ष करून सफाई कामगार मजूरांच्या जिवाशी खेळ करत असुन नगरपरिषद प्रशासन बघ्याची भूमिका घेत असल्याने याबाबत नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

# मराठी भाषा विद्यापीठात प्रवेशासाठी मुदतवाढ : २६ जुलैपर्यंत करता येणार नोंदणी, विद्यार्थी-पालकांचा आग्रह स्वीकारला

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१७मोर्शी

देशातील पहिल्या मराठी भाषा विद्यापीठाच्या प्रवेश प्रक्रियेला आगामी २६ जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. पूर्वीच्या वेळापत्रकानुसार ११ जुलैपर्यंत प्रवेश, १३ जुलैला प्रवेशित विद्यार्थ्यांची घोषणा आणि १६ जुलैपासून प्रत्यक्ष वर्ग सुरु केले जाणार होते. परंतु विद्यार्थी-पालकांच्या आग्रहावरुन प्रवेश प्रक्रियेला आगामी २६ जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

मोर्शी तालुक्यातील महानुभाव पंथीयांची काशी म्हणून ओळख असलेल्या रिद्धपूर येथे मराठी भाषा विद्यापीठ सज्ज झाले आहे. आगामी शैक्षणिक सत्रापासून येथे पहिल्या सेमिस्टरचे वर्ग भरवले जाणार आहेत. पहिल्या वर्षीपासून पदवीसाठी (बीए) आठ तर पदव्युत्तर पदवीसाठी (एमए) सहा अभ्यासक्रम सुरु केले जाणार आहेत. त्यासाठी गेल्या १ जुलैपासून प्रवेश अर्ज स्वीकारणे सुरु झाले आहेत. दरम्यान सर्व अभ्यासक्रम सुरु करण्यासाठीचे



अधिव्याख्याते, सहायक अधिव्याख्याते आणि इतर कर्मचारी यांची जुळवाजुळवही करण्यात आली आहे.

एमएसाठी मराठी समाजभाषा विज्ञान व बोलीविज्ञान, मराठी अनुवादशास्त्र, मराठी अभिजात भाषा व वाङ्मय, मानसशास्त्र, भूगोल (नैसर्गिक संसाधने व पर्यावरण यासह) हे पाच विषय असून मास्टर इन परफॉर्मिंग आर्ट्ससाठी (एमपीए) संगीत हा विषय निश्चित करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे पदवी अभ्यासक्रमासाठी मराठी (भाषा व लिपीशास्त्र), जर्मन भाषा, रशियन भाषा, इंग्रजी भाषा हे चार विषय ठेवण्यात आले असून या विषयांत विद्यार्थ्यांना बी.ए.ची डिग्री मिळेल. या विषयांसोबतच नाटक आणि रंगभूमी व संगीत या दोन विषयात बॅचलर इन परफॉर्मिंग आर्ट्स तर पर्यटन आणि प्रवास व्यवस्थापन या विषयात बीटीटीएम आणि पर्यावरण व्यवस्थापन या विषयात बीइएम ही पदवी दिली जाणार आहे. प्रवेशासंबंधी अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांना ०७२१-२९९०१८६ या क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे प्रशासनाच्या वतीने कळवण्यात आले आहे.

**'इग्नू'चे प्रवेश आता ३१ पर्यंत**

मराठी भाषा विद्यापीठासोबतच इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाच्या (इग्नू) प्रवेश प्रक्रियेलाही मुदतवाढ देण्यात आली आहे. या विद्यापीठाचे प्रवेश १५ जुलैपर्यंतच करावयाचे होते. परंतु विद्यापीठ प्रशासनाने प्रवेश प्रक्रियेसाठी ३१ जुलैपर्यंत मुदवाढ दिल्याचे स्थानिक समन्वयक गजानन पंचवटे यांनी कळवले आहे.

# महिला शेतकऱ्याची कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१७मोर्शी :

पेरणीपश्चात एका महिला शेतकरी यांनी कर्जबाजारीपणाला कंटाळून विष प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना जुना अंतोरा येथे १५ जुलै रोजी संध्याकाळी उघडकीस आली. ७ वाजता

अर्चना महेंद्र गौरखेडे (४५) रा. अंतोरा असे मृतक शेतकरी महिलेचे नाव आहे. आष्टी पोलिसस्टेशन अंतर्गत येत असलेल्या जुना अंतोरा गावातील अर्चना महेंद्र गौरखेडे यांच्याकडे शिरखेड शेतशिवारात २ एकर शेती आहे. महिला शेतकरी हिचे पती पायाने अपंग असून सदर महिला शेतकरी ही नेहमीच विवंचनेत राहत होती. १५ जुलै रोजी नेहमीप्रमाणे ती आपल्या स्वतःच्या शेतात गेली होती; मात्र चार वाजताच्या दरम्यान तिने विष प्राशन करून आपली जीवनयात्रा संपविली. संध्याकाळपर्यंत पत्नी घरी वापस न आल्यामुळे तिचे दिव्यांग पती हे आपल्या मित्राला सोबत घेऊन शेतात गेले असता त्यांना अर्चना हिने विष प्राशन करून आत्महत्या केल्याचे आढळून आले. याप्रकरणी शिरखेड पोलिसांनी मर्ग दाखल पुढील तपास आरंभिला आहे.